पिंपरी चिंचवड महानगरपालिका
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/ २४९/२०१८
दिनांक- २४/०४/२०१८

प्रति,
मा.जाहिरात व्यावस्थापक
१) दै.पुढारी
२) दै.सामना
३) दै.नवभारत

विषय- पिं.चि. मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयास तात्पुरत्या स्वरूपात त्वचा व गुप्तरोग तज्ञ हे पद भरणेकामी जाहिरात प्रकटन मनपाचे बोधचिन्ह व जाहिरात क्रमाकसह शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत..........

२/- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात त्वचा व गुप्तरोग तज्ञ हे पद भरणेकामी सोबत जोडलेले जाहिरात प्रकटन आपल्या वर्तमानपत्रात शासकीय दराने मनपाचे बोधचिन्ह, जाहिरात क्रमांक व स्वच्छ भारत अभियान लोगो सह दिनांक २६/०४/२०१८ पर्यंत प्रसिध्द करून जाहिरात प्रकटन प्रसिध्द केलेला अंकाच्या व बीलाच्या तीन प्रती सात दिवसाचे आत या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. वेळेत बील प्राप्त न झालेस व त्यामुळे बील मिळणेस विलंब झालेस त्यास हा विभाग जबाबदार राहणार नाही.

सोबत- जाहिरात प्रकटन

रोटेशन क्र. ब-३
जाहीरात क्र.१२४०

वैद्यकिय अधिक्षक
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०८
# यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
# संत तुकारामनगर पिंपरी – ४११०१८.

**दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात त्वचा व गुप्तरोग तज्ञ हे पद भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता दरमहा एकत्रित मानधनावर त्वचा व गुप्तारोग तज्ञ हे पद हंगामी/ तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाचे आहे. त्यांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, एकत्रित मानधन व अटीशर्ती खालीलप्रमाणे –

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकत्रित मानधन प्र. महिना र.रू | मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | १ | MD/DNB/DDV (SKIN) | ६००००/- | ०४/०५/२०१८ |

<u>अटीव शर्ती</u>:-

१) मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३) लेखी परिक्षेस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निर्दशनात आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५) सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व स्वत: च्या स्वाक्षरीने व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टिफिकेट, फोटो, इतर सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करण्यात येईल.

७) सदर पदास महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

<u>मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-</u>

- उमेदवारांना रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील. व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.
- उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता नावांपुढे दर्शविण्यात आलेल्या दिनांकास यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील वैद्यकिय अधिक्षक यांचे कार्यालयात स.१०.०० ते ११.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतीसह समक्ष उपस्थित रहावे. तसेच आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखी परीक्षा /मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पद भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

जाहीरात क्र.- 8-3
रोटेशन क्र.- 9280
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/२४६/२०१८
दि.२५/०४/२०१८.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

D/Gaikwad sir/मानधन/मानधन भरती एप्रिल २०१७ दुरुस्ती दि.19-4-2017

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

फोटो

**प्रति,**
**मा.आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

**विषय**- यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधनावरील ---------------------------------------------------या पदासाठी अर्ज.

**संदर्भ**- वायसीएमएच/७/कावि/ /२०१८ दि. / /२०१८ **(जाहिरात क्र.ब-२)**

**महोदय,**

संदर्भिय जाहिरातीनुसार मी श्री/श्रीम.----------------------------------------------- हंगामी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ----------------------------------------- या पदासाठी जाहिरातीमधील आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन या पदासाठी निवड होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

**आडनाव** **स्वत:चे नाव** **वडिल/पतिचे**

---

**१) संपुर्ण नाव– ---------------------------------------------------------------------------------**

**२) पत्रव्यवहारचा पत्ता- -------------------------------------------------------------------------**

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**३) जन्मदिनांक - / /** **मोबाईल क्र. –**

**४) लिंग - पुरुष ☐ स्त्री- ☐** **ईमेल आयडी -**

**५) जात -** **प्रवर्ग –**

**६) महाराष्ट्र मेडीकल/इंडीयन मेडीकल कौन्सिल/नर्सेस कौन्सिल कडील नोंदणी क्र. ----------------- ------------------- दिनांक / /**

**७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –**

| अ.क्र. | शैक्षणिक | संस्था विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

८) तात्रिंक व इतर अर्हता तपशिल - ------------------------------------------------------------

अनुभवाचा तपशिल –

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **एकुण अनुभव -** | **वर्ष -** | **महिने-** | **दिवस-** |

वरील नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कोणतीही कायदेशिर कारवाई केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

**अर्जदाराची सही**

**स्थळ – पिंपरी-१८** **(नाव-** श्री./श्रीम- **----------------------------------)**

**दिनांक- /०५ /२०१८.**

**<u>सहपत्रे</u>– अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**
**(ज्या क्रमाने जोडलेल्या आहेत त्याप्रमाणे लिहणे)**

१) ---------------------------------------------------
२) ---------------------------------------------------
३) ---------------------------------------------------
४) ---------------------------------------------------
५) ---------------------------------------------------
६) ---------------------------------------------------